श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

मे २०२२ | वर्ष-१०, अंक-६ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या 'इन्टर्न्स २०१६ बॅच'चा पदवीप्रदान समारंभ



डेरवण येथील भ.क.ल.वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सन २०१६ च्या 'इन्टर्न्स बॅच'चा पदवीप्रदान समारंभ सोमवार, दि.२५ मार्च २०२२ रोजी सकाळी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या वेळी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्याविषयी शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी डॉ. श्रीपाद बाणवली, डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. आनंद जोशी, डॉ. नरेंद्र शर्मा, प्राचार्य डॉ. विजय डोंबले, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना डॉ. बाणवली यांनी स्वतंत्ररीत्या वैद्यकीय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या या डॉक्टर्सना काही अनुभवाचे बोल ऐकविले. आपल्या भाषणात डॉ. बाणवली म्हणाले, ''तुम्ही कितीही मोठे डॉक्टर व्हा. पण पेशंटला कधी तो गरीब आहे म्हणून कमी लेखू नका. त्याच्याशी हस्तांदोलन करा, आणि पाहा

त्याला किती आनंद वाटतो! प्रत्येक पेशंटला आपुलकीने, मायेने स्पर्श करा, त्याला आपलंसं वाटू द्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कधीच पेशंटला 'आता काहीच नाही होऊ शकत!' असे सांगायचे नाही. तो तुमच्याकडे काही अपेक्षा घेऊन आला आहे आणि त्यासाठी अखेरपर्यंत जमेल तेवढे प्रयत्न करणे हे तुमचे कर्तव्य आहे. स्वतःचे साम्राज्य उभारण्यापेक्षा चांगल्या सेवाभावी संस्थेची उभारणी करा आणि जास्तीतजास्त पेशंटपर्यंत तुमची सेवा पोहोचेल ह्याकडे लक्ष द्या.

आणखी एक महत्त्वाचे म्हणजे अभ्यास येथेच संपला नाही. तो सदैव करावाच लागतो. आयुष्यभर करावा लागतो. अभ्यासाला कंटाळू नका.

वैयक्तिक आयुष्यात काहीही होत असेल, पण त्याचा राग पेशंटवरती कधीच काढू नये आणि पेशंटशी नेहमी विनम्रतेने वागावडॉ. बाणवली ह्यांनी २०१६ बॅचचा पदवीप्रदान सोहळा 'अश्वमेध' साठी आवर्जून उपस्थित राहून या वैद्यकीय महाविद्यालयातील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या दुसऱ्या बॅचच्या युवक डॉक्टरांशी संवाद साधला. ते म्हणाले की जेव्हा मी अमेरिकेतून 'पेडिॲट्रिक ऑन्कॉलॉजी' शिकून आलो, तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की भारतात कॅन्सरचं प्रमाण जास्त असण्यामागे दोन महत्त्वाची कारणं आहेत. पहिले म्हणजे लोक दुखणे अंगावर काढून खूप उशिरा डॉक्टरकडे येतात आणि दुसरे म्हणजे केमो किंवा रेडिओथेरपीसारखे उपचार त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना परवडत नाही. ह्यावर तोडगा म्हणून त्यांनी 'ओरल केमोथेरपी' या उपचारपद्धतीचा अवलंब सुरू केला आहे. यामध्ये औषधांचे लहान डोस साप्ताहिक काळाने देता येतात. यामुळे रुग्णाला हे उपचार कमी खर्चामध्ये उपलब्ध होतात आणि त्यामुळे उपचारात आर्थिक कारणासाठी खंड पडत नाही.

डॉ. सुनील नाडकर्णी, डॉ. आनंद जोशी, डॉ. नरेंद्र शर्मा, प्राचार्य डॉ. विजय डोंबले, वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनीही याप्रसंगी समयोचित मार्गदर्शन करून सर्वांना शुभेच्छा दिल्या.


डॉ. श्रीपाद बाणवली यांचे स्वागत


प्रा. डॉ. विजय डोंबले यांचे स्वागत


डॉ. सुनील नाडकर्णी यांचे स्वागत


डॉ. सुवर्णा पाटील यांचे स्वागत


डॉ. नरेंद्र शर्मा व डॉ. आनंद जोशी यांचे स्वागत

# बालरोगतज्ज्ञ डॉ. अनुराधा खाडिलकर, एम.डी., यांची वालावलकर रुग्णालयाला भेट

डॉ. अनुराधा खाडिलकर, उपसंचालक, हिराबाई कावसजी जहांगीर मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट, जहांगीर हॉस्पिटल, पुणे, 'ग्रोथ अँड पेडियाट्रिक एंडोक्राइन युनिट', एम.डी., बालरोगतज्ज्ञ, यांनी गुरुवार, दि. २८ मार्च २०२२ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाला भेट दिली आणि 'डेरवण कोहर्ट' या प्रोजेक्टवर चर्चा केली. त्यांनी पवारसाखरी, गुहागर या गावात जाऊन किशोरवयीन मुलींबरोबर सुसंवादही साधला. डॉ. खाडिलकर यांच्या संशोधनाच्या मुख्य क्षेत्रांमध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी, अंतःस्रावी आणि अनुवांशिक विकार आणि बालपणातील मधुमेह, पोषण आणि वाढीचे विकार आदींचा समावेश आहे.



*डावीकडून चारुदत्त जोगळेकर, ओमकार डेरवणकर, डॉ. अस्मिता जाधव, डॉ. दीपाली लडकत, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. अनुराधा खाडिलकर, डॉ. डेमी मिरियम, डॉ. रुबिना मंडलिक, अनघा देशमुख, पल्लवी भट, शारदा खराडे, स्वाती सोनवणे, रुपाली चव्हाण*




*डॉ. वैशाली देशमुख, बालरोग व किशोरवयीन मुलांच्या तज्ज्ञ, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे, यांनी शनिवार, दि. ३० मार्च २०२२ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाला भेट दिली आणि रुग्णालयातील मानसशास्त्रज्ञांच्याबरोबर सुसंवाद साधला.*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

## डेरवण शाळेच्या विद्यार्थ्यांचे दुर्बिणीद्वारे अवकाश निरीक्षण

आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ज्ञानार्जनाच्या नवनव्या संधी शहरातील विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होत असताना याच सोयीसुविधांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील मुले मात्र यापासून वंचित राहतात. अवकाश निरीक्षणाची संधी उपलब्ध होणे ही प्रत्येकासाठी महापर्वणी असते. आकाशाच्या पटलावर ग्रह ताऱ्यांचे आगमन-निर्गमन स्वत:च्या डोळ्यांनी अनुभवणे हा सर्वांच्या कुतूहलाचा विषय. डेरवण येथील 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मिडियम स्कूल' आणि 'ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स'च्या 'आर्यभट्ट स्काय गेझर्स क्लब' च्या माध्यमातून इ. ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दुर्बिणीद्वारे अवकाश दर्शनाची संधी उपलब्ध करून देण्यात आली. पुणे येथील 'कुतूहल' या विज्ञानविषयक उपक्रमांसाठी प्रसिद्ध असलेल्या संस्थेचे संचालक श्री. सुयश डाके, श्री. दिनेश निसंग व श्रीम. निकिता कुलकर्णी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना 'स्लाईड शो' द्वारे ग्रह, तारे, खगोलशास्त्रज्ञ, दुर्बिणींचे प्रकार, अवकाश यान, अंतराळ मोहिमा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. रात्री ठीक ८.३० ते १२.३० व पहाटे ३.३० ते ५.३० या वेळेत टेलिस्कोपद्वारे प्रत्यक्ष अवकाशदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मार्गदर्शकांमार्फत तीन टेलिस्कोप व डेरवण शाळेच्या स्वत:च्या टेलिस्कोपद्वारे विविध तारे, राशी, ग्रह व चंद्राचे निरीक्षण करण्यात आले.

शनी, मंगळ, शुक्र, गुरू या ग्रहांचे व चंद्राचे एकापाठोपाठ एक पूर्व क्षितिजावर आगमन व त्यांचे दुर्बिणीद्वारे स्पष्ट दर्शन अनुभवण्याची नेत्रसुखद संधी विद्यार्थ्यांना लाभली. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांनी हा कार्यक्रम यशस्विरीत्या पार पाडला. अवकाश दर्शनासाठी विद्यार्थ्यांना राहण्याची व अल्पोपहाराची व्यवस्था संस्थेमार्फत विनामूल्य करण्यात आली होती. तसेच अवकाश अभ्यासाचे 'तारामंडल' हे उपकरण सर्व  उपस्थित विद्यार्थ्यांना मोफत देण्यात आले.

'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' या संस्थेचा नेहमीच कटाक्ष असतो की शिक्षण हे पुस्तके आणि वर्गांच्या भिंतींमधून बाहेर काढून वास्तविक जगाशी, आपल्या जीवनाशी, आसपासच्या वातावरणाशी जोडले गेले पाहिजे. Engage, Explore, Experience, Express and Excel हा नव्या युगाच्या शिक्षणाचा मूलमंत्र शाळेच्या शिक्षणप्रणालीने आत्मसात केला आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांसमोर विविध अभ्यासक्षेत्रे उलगडून तज्ज्ञांमार्फत मार्गदर्शन केले जाते. आवडीचे रूपांतर व्यवसायात करून विद्यार्थी आपली प्रगती करू शकतात. विद्यार्थी बहुआयामी होणे हीच याची फलश्रुती!





मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील - ९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव - ९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर - ९५८८४ ७९२२०